# वर्तमान भारतातील सु-शासन कारभारासमोरील आव्हाने

**डॉ.खंडेराव ज्ञानदेव खळदकर** राज्यशास्त्र विभाग प्रमुख जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर ता. शिरोळ, जि.कोल्हापूर

मो.८२७५८९६१००, ८४८२९८९१०१ E-Mail: kdkhaladkar1@gmail.com

---

वर्तमान काळात देशासमोर जे प्रमुख निर्णायक प्रश्न उभे राहिले आहेत त्या सर्वांमध्ये सु-शासन (Good Governace) हा प्रश्न सर्वाधिक महत्त्वाचा आहे. देशाची भौगोलिक विशालता, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक विविधता, परंपरा आणि जागतिक स्तरावर घडून येत असलेल्या घटनांचा दबाव हा आपल्या शासन-प्रशासनासमोर अनेकविध आव्हाने उभी करीत आहे. आपल्या संविधानाद्वारा आपण प्रत्येक भारतीय नगरिकास गुणवत्तापूर्ण जीवन जगण्याची व्यवस्था करून देणे हे आपले आद्य कर्तव्य मानले आहे. समाजाची स्वाभाविक अशी एक अपेक्षा असते की, सर्वसामान्य व्यक्तीस केवळ आवश्यक असणाऱ्या सर्व गरजांची पूर्तता झाली पाहिजे. एवढेच नव्हे तर तिच्या विकास व वृद्धीची देखील संभवनीयता असली पाहिजे हे दायित्त्व पूर्ण करणे शासनासमोरचे सध्या लोकसंख्येचा विस्फोट आणि त्यास अनुसरून अपेक्षित संसाधनाच्या कमतरतेमुळे एक मोठे आव्हानच बनले आहे. यासाठी सक्रीय व प्रभावी शासन, प्रशासन यंत्रणेची आवश्यकता आहे. समाजातील सर्व घटकांचा विकास करणे, दारिद्रय निर्मुलन आणि अनेकविध मतभेदांना दूर करण्याच्या हेतूने संकल्प करण्यात आला आहे. हा संकल्प तेव्हाच पूर्ण होऊ शकेल की, जेव्हा शासन-प्रशासनाच्या, कार्यक्षमतेत, गुणवत्तेत योग्य सुधारणा घडून येईल.

**सु-शासन संकल्पना (Concept of Good Governance)**

'शासन हि संकल्पना भारतासाठी नवीन नाही. ती कौटिल्य कालापासूनच अस्तित्वात आहे. मात्र १९८० च्या दशकात जागतिक स्तरावर या संकल्पनेला अधिक महत्त्व आले आणि चांगल्या/ सु-शासनाची मागणी जनता करू लागली. मानवी विकास अहवाल २००२ नुसार सुशासन म्हणजे काय, या प्रश्नाला एक उत्तर नाही तर शासकीय संस्थांची आणि नियमांची जास्तीतजास्त परिणामकारकता वाढविणे, जनसहभागीत्वात वाढ करणे, कायद्याचे राज्य प्रस्थापित करणे या घटकांचा समावेश सु-शासनात होतो. म्हणजे सु-शासन ही प्रशासनाला दिशा दाखविणारी, कायद्याची समानता प्रस्थापित करणारी, जनतेचे हित साध्य करणारी संकल्पना आहे. सुशासन ही संकाल्पना प्रत्यक्षात पूर्णपणे प्रशासनात यावी यासाठी भारत सरकार २०१४ पासून २५ डिसेंबर हा दिवस सु-शासन म्हणून साजरा करीत आहे' (यशदा, यशमंथन,एप्रिल-जून २०१७,पृ.६) शासन ही एक मुल्य निरपेक्ष संकल्पना आहे. तर उत्तम शासन ही एक मुल्य सापेक्ष संकल्पना आहे. अर्थात प्रत्येक प्रकारचे शासन हे उत्तम शासन असू शकत नाही तर एक विशेष प्रकारचेच शासन हे सु-शासनाच्या श्रेणीत समाविष्ट होऊ शकते. प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष स्वरूपात आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था ह्या विकसनशील देशांना आर्थिक मदत देताना उत्तम/ सु-शासनाची अट घालतात. याचे तात्पर्य असे की, ज्या देशांमध्ये सु-शासन कारभाराची अधिक गुणवैशिष्टये दिसून येत असतील किंवा त्याची तशी खात्री दिली जात असेल अशाच देशाना आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था व विकसित देणगीदार देश मोठ्या प्रमाणात आर्थिक साह्य, मदत करतात व त्यावर देखरेखही ठेवतात. उत्तम/ सु-शासन कारभारात लोकसहभाग, कायद्याचे राज्य, पारदर्शकता, जबाबदार शासन, उत्तरदायीत्त्व, प्रतिसाद, सार्वमत, परिणामकारकता व कार्यक्षमता, समता व समावेशकता, लोकाभिमुखता इत्यादी गुंणवैशिष्टये दिसून येतात. चांगल्या सु-शासन कारभारामध्ये अल्पसंख्यांची मते व सर्व सामान्यांचा आवाज निर्णय प्रकियेची अंमलबजावणी करताना दाबला जाणार नाही याची खबरदारी घेतली जाते. त्याचवेळी सु-शासन कारभारामध्ये समाजाच्या वर्तमानकाळातील व भविष्यकाळातील गरजांच्या पूर्णतेचीही खबरदारी घेतली जाते. प्रस्तुत लेखात सु-शासन कारभाराची विशेष गुणवैशिष्टये, घटक कोणते आहेत आणि वर्तमान काळात भारतात उत्तम/ सु-शासनकारभार होण्यासाठी कोणकोणत्या आव्हानांना सोमोरे जावे लागेल यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**सु-शासनाची गुणवैशिष्टये :**

1. **लोकसहभाग :** शासन प्रक्रियेमध्ये विविध स्तरांवर व्यापक प्रमाणावरील लोकसहभाग हे सु-शासन कारभाराचे मुख्य लक्षण मानले जाते. यामध्ये विविध वर्गातील सर्व लोक प्रभावीपणे सहभागी होऊ शकतात. या प्रकारचा सहभाग हा प्रत्यक्ष किंवा कायदेशीर मध्यस्थ संस्था किंवा त्यांच्या प्रतीनिधीत्वाद्वारे दर्शविला जातो.

2. **कायद्याचे राज्य :** 'कायदा सर्वांसाठी एक, कायद्यापुढे सर्व समान' या तत्त्वानुसार कायद्याची नि:पक्षपातीपणे अंमलबजावणी हे सु-शासनात अभिप्रेत असते. शासन कारभारासाठी अनुकूल किवा चांगल्या कायद्याच्या अशा चौकटीची गरज असते की, जी नि:पक्षपणे अंमलात आणता येते. शिवाय यामध्ये मानवी अधिकारांना पूर्ण संरक्षण विशेषत: अल्पसंख्याकांना ते मिळणे गरजेचे असते. कायद्याच्या निष्पक्ष अंमलबजावणीसाठी स्वतंत्र न्यायव्यवस्थेची व निष्पक्ष व भ्रष्टाचार मुक्त पोलिस यंत्रणेची गरज असते.

3. **पारदर्शकता:** पारदर्शकता हा उत्तम/ सु-शासनाचा आत्मा मानला जातो. पारदर्शकता याचा अर्थ शासन व प्रशासन स्तरावर घेतलेले निर्णय व त्यांची अंमलबजावणी कायद्याला अनुसरून असणे, याचा दुसरा अर्थ असाही आहे की, ज्या व्यक्तींवर अशा निर्णयांच्या अंमलबजावणीचा चांगला-वाईट परिणाम होतो, त्या व्यक्तींना त्याची माहिती विनाशुल्क व सहज उपलब्ध होणे. अशी माहिती कुठेही न दडवता, आवश्यक त्या प्रमाणात व सहज समजेल अशा पद्धतीने पुरवणे आवश्यक ठरते. थोडक्यात शासनदरबारी आणि प्रशासनात कोणत्याही स्वरूपाचा झालेला, होत असलेला गैरव्यवहार, पदाचा गैरवापर व भ्रष्टाचार इत्यादी संबधी माहिती सर्वसामान्य माणसाला सहजपणे उपलब्ध व्हावी हे सुशासनात अपेक्षित असते.

4. **प्रतिसाद :** सु-शासन/उत्तम शासन कारभारात एखादी संस्था व तिच्या निर्णय व धोरण प्रक्रियेची माहिती संबंधीत घटकांपर्यंत कमीतकमी कालावधीत पोहचणे अभिप्रेत असते.

5. **सार्वमत :** कोणत्याही समाजात काही विशिष्ट घटक व त्यांची विविध मते, विचार असू शकतात. सु-शासन करभारात अशा विविध मतांचे किंवा या विचारामधून असा मध्य काढणे गरजेचे असते की, ज्यामुळे संपूर्ण समाजाचे भले होईल. यामध्ये शाश्वत मानवी कल्याण साध्य करण्यासाठी दीर्घकालीन योजनेची गरज असते. यासाठी समाजाच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक व सामाजिक संदर्भाची इत्यंभूत माहिती असणे आवश्यक ठरते.

6. **समता व समावेशकता :** जात, धर्म, भाषा, वर्ग, वंश, लिंग, शारीरिक विकलांग इत्यादींच्या आधारावर भेदभाव न करता, समाजातील सर्वच घटकांना विकासाच्या समान संधी दिल्या जातात. हे उत्तम/ सु-शासन कारभाराचे मुख्य लक्षण असते. एका चांगल्या समाजाचे अस्तित्त्व तेव्हाच निर्माण होते, जेव्हा समाजातील सर्व घटकांना असे वाटते की, आपला या प्रक्रीयेत काहीतरी वाटा आहे व समाजाच्या मुख्य प्रवाहात आपणही सहभागी आहोत. यासाठी समाजाच्या सर्व घटकातील भेद कमी करून त्यांना सुधारण्याची संधी देणे आवश्यक ठरते.

7. **परिणामकारकता व कार्यक्षमता:** सु-शासन/उत्तम शासन कार्भाराद्वारे समाजाच्या विविध गरजांच्या पूर्ततेसाठी संसाधनांचा पर्याप्त वापर होत राहतो. शासनकारभारामध्ये चिरंतन/ शाश्वत (चिरंजीवी) विकास करताना नैसर्गिक संसाधनाच्या पर्याप्त वापराची व पर्यावरणाच्या संरक्षणाची व संवर्धनाची खात्री असते.

8. **जबाबदार शासन :** शासनाच्या प्रत्येक यंत्रणेने आपल्या कार्यक्षेत्रातील कार्याबद्दल स्वतः जबाबदार असले पाहिजे हे तत्त्व सु-शासनात असते. उत्तम कारभारामध्ये जबाबदारपणा ही एक मुख्य आवश्यकता मानली जाते. शासकीय, खाजगी किंवा सामाजिक संस्था असोत या सर्वांनी जनतेशी तसेच संबंधीत घटकांशी आपली जबाबदारी जपली पाहिजे. थोडक्यात, कोणत्याही संस्थेने आपल्या निर्णय प्रक्रियेमुळे ज्या घटकावर बरावाईट परिणाम होणार आहे. त्यांच्या प्रति आपली जबाबदारी जपायलाच पाहिजे.

9. **उत्तरदायीत्व :** शासन आणि प्रशासनाने आपल्या कार्य व कर्तव्याबद्दल जनतेस उत्तर देण्यास कटिबद्ध असले पाहिजे हे सु-शासनात अपेक्षित असते.

10. **लोकाभिमुखता:** जनता हा जनाधार मानून जे शासन चालविले जाते, जे शासन उत्तम राज्यकारभाराद्वारे लोकापर्यंत पोहचते, त्याला लोकमताचा पाठिंबा प्राप्त होत असतो. म्हणून प्रत्येक शासन जास्तितजास्त लोकाभिमुख होण्यावर भर देत असते.

थोडक्यात, वरील काही घटकांद्वारे उत्तम/ सु-शासन कारभाराची गुणवैशिष्ट्ये स्पष्ट करता येतात. यापैकी महत्तम घटकांच्या अंमलबजावनीद्वारेच कोणत्याही शासनसंस्थेला उत्तम राज्यकारभार अथवा सु-शासन कारभार करता येतो.

**सु-शासन काराभारासामोरील आव्हाने:**

प्राचीन काळापासून भारतातील चालत आलेल्या शासन कारभाराच्या परंपरेत स्वातंत्र्यप्राप्तीनंतर व्यापक बदल होत गेले. त्यात पुन्हा अलीकडच्या काळात म्हणजेच १९९० नंतरच्या स्वीकारलेल्या नव्या आर्थिक धोरणाच्या (उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण) काळानंतर देशाच्या शासन कारभाराला नवे वळण मिळत गेले. यातूनच भारतातील शासनकारभार उत्तमतेकडे वाटचाल करत असला तरी जागतिकीकरणाच्या काळात आर्थिक सुधारणांची वाढलेली गती व त्यातून राज्यव्यवस्थेतील, समाजव्यवस्थेतील व अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रात होणारे बदल पाहता वर्तमान व भविष्यकाळात शासनासमोर पुढील काही घटकांचा मुकाबला करून त्यावर मार्ग काढणे हे एक प्रकारे आव्हान असणार आहे.

1. **सुरक्षितता :** कोणत्याही शासनव्यवस्थेतील सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे सुरक्षितता. त्यामध्ये विशेषतः जीवनविषयक, मालमत्तेविषयक व स्वातंत्र्यविषयकची सुरक्षितता महत्त्वाची मानली जाते. याचाच भाग म्हणून दहशतवाद, नक्षलवाद, धार्मिक मूलतत्त्ववाद, जमातवाद यासारख्या विघातक व प्रतिगामी शक्तींपासून पुरोगामी विचारांना, लोकांना जीवनविषयक, मालमत्तेविषयक व स्वातंत्र्यविषयक (विचार व अभिव्यक्ती करण्याचे स्वातंत्र्य) संरक्षण पुरविण्याची गरज आहे. आज देशात जमावटोळी, अत्याचारा (Mob Lynching) चे प्रकार वाढत आहेत. (जमाव टोळीकडून अल्पसंख्यांक व विरोधी विचारांची, मतांची, लोकांची होणारी हत्या थांबवणे गरजेचे आहे) त्याकडे उत्तम/सु-शासन कारभारासामोरील एक आव्हान म्हाणून पहिले पाहिजे. यासाठी शासनाकडे उपलब्ध असलेल्या कायदा व सुव्यवस्थेविषयक सर्व साधनांचा वापर करून असे प्रकार आटोक्यात आणायला हवेत. हे वर्तमान शासानासामोरील मोठे आव्हान आहे.

2. **कायद्याचे राज्य:** कायद्याचे राज्य म्हणजे कायद्यासमोर सर्व समान. याचा अर्थ आपण देशात कायद्याचे राज्य आहे असे म्हणत असताना त्यात कायद्यापेक्षा कुणीही श्रेष्ठ, सर्वोच्च नाही हे मान्य करत असतो. परंतु यात एका बाजूला कायदा सरकारी प्रक्रियेचे एक साधन असल्याने शासन हे कायद्यापेक्षा वरचे ठरते. तर दुसऱ्या बाजूला आपण कायापेक्षा शासन सुद्धा श्रेष्ठ नाही असेही मानतो. आपल्या संविधानाप्रमाणे शासन मानवाचे जीवन व त्याच्या संबंधित प्रत्येक घडामोडींना संरक्षण देण्यासाठी कटिबद्ध असते. म्हणून आजच्याकाळात उत्तम/सु-शासनासमोरही वचनबद्धता जोपासण्याचे एक प्रकारचे आव्हानच आहे.

3. **सबलीकरण :** सबलीकरण म्हणजे समाजातील सर्व घटकांचा सर्वांगीण विकास साधने, त्यांना स्वालंबी, स्वयंपूर्ण बनवणे. सबलीकरण दृष्टीकोन हा दारिद्र्यात घट करतानाच दारिद्य रेषेखालील लोकांना विकासाच्या प्रक्रियेत सामील करून घेणे यावर अवलंबून आहे. सबलीकरणामध्ये आजपर्यंतच्या विकासाच्या प्रक्रियेतून बाहेर राहिलेल्या उपेक्षित, वंचित, शोषित अशा सर्व

घटकांचा समावेश होतो. उदा. स्त्रिया, अनुसूचित जाती व जमातीतील लोक, शिक्षणाच्या प्रवाहातून अलिप्त राहिलेली मुले व इतर यासाठीच अशा घटकांना केवळ शासकीय पातळीवरून मदत किंवा आरक्षण देऊन चालणार नाही, तर ते खाजगी पातळीवरही मिळायला हवे. सद्याच्या राजकीय व प्रशासकीय क्षेत्रातील आरक्षणाप्रमाणे अनु.जाती-जमातीच्या लोकांना, महिलांना सर्वच सहकारी व खाजगी उद्योग क्षेत्रात आरक्षण द्यायला हवे. तसेच दुसऱ्या बाजूला गरीब, मागास विद्यार्थ्यासाठीच्या शैक्षणिक संधी कशा वाढवायच्या, त्यांच्या कौशल्यात व गुणवत्तेत कशी वाढ घडवून आणायची आणि त्यांची दीर्घकालीन सामाजिक, आर्थिक पात, दर्जा कशाप्रकारे उंचवायचा हे आज शासनासामोरील आव्हान आहे.

4. **रोजगार निर्मिती :** आज भारतीय शासन व अर्थव्यवस्थेपुढे उत्पादकक्षम रोजगार निर्मिती करणे हे एक मोठे आव्हानात्मक काम उभे ठाकले आहे. कारण २०५० पर्यंत देशातील कर्त्या लोकसंख्येचे प्रमाण एकूण लोकसंख्येत साधारणत: ६० टक्के इतके असणार आहे. कर्त्या लोकसंख्येतील वाढ ही जास्तीच्या बचत व गुंतवणुकीकडे घेऊन जात असली तरी शिक्षण व रोजगारात वाढ न होता केवळ लोकसंख्येत होणारी वाढ अर्थव्यवस्थेला प्रगतीच्या वाटेवर मात्र घेऊन जाऊ शकत नाही. यासाठी लोकांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासह त्यांच्या कौशल्यात वाढ होईल असे कार्यक्रम शासनाद्वारे राबविणे गरजेचे आहे. परंतु या प्रक्रीयेत खाजगी क्षेत्राची मदत घेणे क्रमप्राप्त असले तरी येत्या काळात सु-शासन कारभारासमोरील तेही एक आव्हानच ठरणार आहे.

5. **सेवांची पुर्तता :** विशिष्ट घटकांपर्यंत कोणत्याही व्यवस्थेतील मुलभूत सेवा परिणामकारकपणे पोहचवताना एका गोष्टीची काळजी घेणे गरजेचे ठरते. ती म्हणजे अशा सेवांचा प्रवास खालच्या घटकांपासून वरच्या घटकांपर्यंत व्हायला हवा. याच्या उलट मात्र होता कामा नये. खरंतर आजही आपण पाहतो की शिक्षण, आरोग्य, पाणी, उर्जा, नैसर्गिक साधन संपत्ती आदी सुविधांचा महत्तम उपभोग हा गरीबेत्तर समाजाकडूनच जास्त प्रमाणात घेतला जातो. कारण गरीबासाठीच्या शैक्षणिक सुविधा, आरोग्य व्यवस्था, अन्नधान्य पुरवठा व्यवस्था, उर्जा व पाणी पुरवठा व्यवस्था तांत्रिक गुणवत्तेत किती चांगल्या असतात हे आपणास माहितच आहे. या सर्व सोई सुविधांचे खालच्या घटकापर्यंत योग्य, न्याय्य व रास्त वाटप, वितरण कसे करायचे हे आज उत्तम/ सु-शासनासमोरील मोठे आव्हान आहे. यावर उपाययोजना शोधण्यासाठी न्यायव्यवस्था, दृकश्राव्य माध्यमे व सजग नागरीसमाज, संस्था, संघटना हे घटक महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. तसेच मुलभूत व पायाभूत सेवासंबंधी दीर्घकालीन धोरण, योजना आखून त्यांची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी कोणाही एका पक्षाचे बहुमत असलेले स्थीर सरकार असणे हाही यावरील एक उपाय ठरू शकतो.

6. **प्रशासकीय प्रतिसाद :** जनतेचे प्रश्न, समस्या यांची शासन व प्रशासनाने तात्काळ दखल घेणे, शासनाने घेतलेले धोरणात्मक निर्णय प्रशासनाद्वारे कार्यक्षम अंमलबजावणी करून अल्पावधीत जनतेपर्यंत पोहचवणे हे उत्तम/ सु-शासन कारभाराचे लक्षण मानले जाते. परंतु आज देशातील नागरिकांना कमी वेळेत गुणवत्तापूर्ण सेवा न देण्यास प्रशासनामध्ये असलेली नोकरशाहीतील गुंतागुंतीची प्रक्रिया व अकार्यक्षमता कारणीभूत ठरते आहे. प्रशासनामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळापासून नसलेली पारदर्शकता, कार्यक्षमता व सुरक्षितता आणि दुसऱ्या बाजूला भ्रष्ट्राचार यामुळे अन्यायकारक निर्णय प्रक्रिया आजही अस्तित्वात आहे. त्यामुळे प्रशासकीय कामकाजाची गती मंद आहे. एकंदरीत, प्रशासनाची प्रतिसादात्मक क्षमता, गतिमानता वाढविणे हे आज सु-शासन कारभारासामोरील महत्त्वाचे आव्हान आहे. याला राजकीय प्रतिनिधीत्त्वही तेवढेच जबाबदार आहे. यावर उपाययोजना म्हणून प्रशासनातील प्रमुख वरिष्ठ अधिकाऱ्यांपासून ते कनिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत विशिष्ट कालावधीनंतर सातत्याने बदल्या (राजकीय हस्तक्षेपा शिवाय) करणे, कार्यक्षम अधिकाऱ्यांना प्रोस्ताहन, बढती व संरक्षण देणे. भ्रष्ट अकार्यक्षम अधिकाऱ्यांचे वेतनवाढ रोखणे तसेच भ्रष्ट व अकार्यक्षम, बेजाबदार लोकप्रतिनिधींना परत बोलवण्याचा अधिकार जनतेला मिळावा. त्यामुळे प्रशासनाची प्रतिसादात्मक क्षमता वाढून ते गतिमान होण्यास मदत होईल.

7. **क्षमता निर्मिती :** प्रशासकीय कर्मचाऱ्यांची क्षमता निर्मिती हा घटक गुणवत्तापूर्ण सेवा देण्यासाठी व ग्राहकांच्या समाधानाच्या दृष्टीने कोणत्याही व्यवस्थेच्या सर्वच पातळ्यांवर महत्त्वाचा मानला गेला आहे. क्षमता निर्मिती ही प्रशासकीय नागरी सुविधांच्या व्यावसायीकरणावर अधिक अबलंबून असते. आज जागतिकीकरणाच्या युगात सामान्य लोकांना खाजगी क्षेत्राच्या तुलनेत सार्वजनिक क्षेत्रातील कर्मचाऱ्यांची कमी पातळीवरील गुणवत्ता, क्षमता, व्यावसायिकता सहज जाणवू लागली आहे. आज विविध सार्वजनिक क्षेत्रातील अधिकारी व कर्मचारी वर्गामध्ये क्षमता निर्मिती करणे, व्यावसायिकता निर्माण करणे हे सु-शासन कारभारासामोरील मुख्य आव्हान आहे.

8. **राजकारणाचे गुन्हेगारीकरण :** राजकारणाचे वाढते गुन्हेगारीकरण हे वर्तमान भारताच्या राजकारणाचे महत्त्वाचे लक्षण बनू पहात आहे. कोणत्याही देशातील शासनकारभार उत्तमपणे चालविण्यासाठी जे राज्यकर्ते जनतेकडून निवडून दिले जातात ते भ्रष्ट व गुन्हेगारी प्रवृत्तीचे असता कमा नये. अन्यथा देशातील लोकशाहीची सर्वोच्च संस्था असणारी संसद गुन्हेगाराचे केंद्र होऊ शकते. आज आपल्या देशाच्या कायदेमंडळात, राज्यांच्या विधिमंडळात भ्रष्ट व गुन्हेगारी प्रवृत्ती असणाऱ्या जनप्रतिनिधींचे निवडून जाण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. म्हणूनच राजकारणातील अशा प्रवृत्तींच्या लोकांना राजकीय प्रक्रियेतून बाहेर काढणे हे आजच्या काळात उत्तम शासन अथवा सु-शासन कारभाराच्यादृष्टीने मोठे आव्हान ठरत आहे.

9. **भ्रष्टाचार :** आज भारतात राजकीय व प्रशासकीय क्षेत्रात सातत्याने व मोठ्या प्रमाणात होणारा भ्रष्टाचार उत्तम शासन कारभाराच्या मार्गातील मोठा अडथळा मनाला जात आहे. त्याचे मुख्य कारण गुंतागुंतीची, अकार्यक्षम व अपारदर्शक शासन व प्रशासन प्रक्रिया,

प्रभावी व परिणामकारक नियमणाचा अभाव, शासनाची सेवा पुरवण्याच्या क्षेत्रातील मक्तेदारी, देशातील लोकांमध्ये शासन-प्रशासन प्रक्रियेविषयीच्या माहितीचा अभाव, तसेच जागृत नागरी समाजाचा अभाव यात दडलेले आहे.

10. **कायदेशीर व न्यायालीन प्रक्रियेत सुलभता आणणे:** देशात जर योग्य पद्धतीने कायद्यांची अंमलबजावणी होत असेल तर जनतेला न्यायाचा हक्क हा आपोआप प्राप्त होतो. प्रत्यक्ष मात्र त्यात काही अडथळेही असू शकतात. कारण काही नागरिकांना आपले अधिकार कायदेशीर प्रक्रियेत अडकण्याच्या भीतीमुळे अज्ञान असते. याशिवाय बऱ्याचवेळा कायदेशीर व न्यायालयीन प्रक्रिया इतक्या क्लिष्ठ, गुंतागुंतीच्या व वेळ खाऊ असतात की त्यामुळे सामान्य नागरिक त्याला कंटाळतो. यासाठी या प्रक्रियेत लवचिकता, सहजता व सुलभाता आणणे की जेणेकरून सामान्य लोकांना कायदेशीर बाबी अल्पवेळेत कशा पोहोचवता येतील हे एक आज सु-शासन कारभारासमोरील आव्हान ठरत आहे.

11. **निवडणूक सुधारणा :** अधिकृत नोंदणी असणाऱ्या व ज्यांना प्रादेशिक व राष्ट्रीय राजकीय पक्ष म्हाणून दर्जा मिळालेला असेल अशाच राजकीय पक्षांना (भ्रष्ट व गुन्हेगारी प्रवृतीच्या व्यक्तींना उमेदवारी देणाऱ्या पक्षांना वगळून) निवडणुक आयोगादरे निवडणुकीच्यावेळी जर निवडणूक निधी दिला गेला तर, त्यातून निवडणुकांसाठी अवैद्य मार्गाने मिळणारा पैसा व भ्रष्टाचार कमी होण्यास मदत होईल. यामुळे विविध राजकीय पक्षांना व उमेदवारांना निवडणूक खर्चाची मर्यादा घालता येते व त्यातून एखादा हुशार, अभ्यासू लायक व विविध सामाजिक, आर्थिक, राजकीय, प्रशासकीय प्रश्नांची जाण व भान असणारा योग्य उमेदवार निवडणूक लढवू शकेल. तसेच निवडणुका नि:पक्षपणे, भ्रष्टाचारविरहीत पार पडून योग्य लोकप्रतिनिधी कायदेमंडळात, विधिमंडळात निवडून येतील. शिवाय भारतीय राजकारणाचे स्वरूपही बदलेल. या प्रक्रियेला जरी वेळ लागणार असला तरी उत्तम सु-शासन कारभाराच्या दृष्टीने ही प्रक्रिया अस्तित्त्वात येणे आवश्यक आहे. म्हणूनच ही आवश्यकता पूर्ण करणे हे आज आपल्या सु-शासन कारभारासमोरचे एक आव्हान आहे.

**समारोप :** वरील विवेचनावरून असे म्हणता येईल की, कोणत्याही शासन व्यवस्थेतील उत्तम अथवा सु-शासन कारभार हा विकासाच्या प्रक्रियेत कितपत योगदान देतो तसेच सु-शासनकारभाराद्वारे चिरंतन/शाश्वत विकास शक्य आहे का? या प्रश्नांवर विविध तज्ज्ञांनी मते व्यक्त केली आहेत. प्रसिद्ध तज्ञ मौरो यांच्या मते, सु-शासनकारभार विकासाला प्रेरणा देतो. तर विकासाच्या गतीमुळे पुन्हा शासनकारभार उत्तमतेकडे जातो. भारतात १९९० पासून नवीन आर्थिक सुधारणांची अंमलबजावणी प्रभावीपणे सुरु झाल्यापासून विकासाचा वेग सातत्याने वाढत आहे. तर त्याचवेळी शासन कारभारातही व्यापक प्रमाणात सुधारणा होताना दिसत आहेत. परंतु उत्तम अथवा सु-शासन कारभारापर्यंत पोहचण्यासाठी देशात धार्मिक शांतता, सुव्यवस्था प्रस्थापित करणे, सुलभ कायदेशीर व न्यायालयीन प्रक्रिया असणे, सबलीकरणाच्या धोरणाला आणखीन बळ देणे, रोजगारनिर्मिती करणे, वस्तू व सेवांचे योग्य व न्याय्य वितरण करणे, प्रशासकीय प्रतिसादात गतिमानता आणणे, सार्वजनिक क्षेत्रातील कर्मचारी वर्गात व्यावसायिकता निर्माण करणे, लोकप्रतिनिधी व नोकरशाहीचे जनतेप्रती उत्तरदायित्त्व असणे. ई-शासन, ई-प्रशासनचा प्रभावीपणे वापर करणे, भ्रष्टाचाराचे निर्मुलन, राजकारणाचे गुन्हेगारीकरण रोखणे तसेच परिणामकारक निवडणूक सुधारणा करणे यासारख्या प्रमुख घटकांचे आव्हान व त्यांचा मुकाबला करणे हे वर्तमान व भविष्यकालीन कोणत्याही शासनासमोरील एक आव्हान असणार आहे. परंतु यावर मात करण्यासाठी शासन-प्रशासन प्रक्रियेत विविध स्तरावर व्यापक स्वरूपात लोकसहभाग वाढविणे, सामाजिक क्षेत्रात धार्मिक, वांशिक व जातीय सहिष्णुतेला प्रोस्ताहन देणे. सर्व प्रकारच्या विषमता दूर करणे तसेच ई-शासन व ई-प्रशासनावर भर देणे, बहुमतातील एकाच पक्षाचे स्थिर सरकार अस्तित्त्वात येण्याबरोबरच सर्वसमावेशक, प्रभावशाली व कार्यक्षम राष्ट्रीय राजकीय नेतृत्त्व असणे. अधिकाधिक तंत्रज्ञानाचा वापर करून पारदर्शक, गतिमान व लोकाभिमूख शासन व प्रशासन प्रक्रिया प्रत्यक्षात अस्तित्वात येणे उत्तम/ सु-शासन कारभारासाठी नितांत गरजेचे आहे. सध्या भारत सरकार व घटकराज्य सरकारांकडून ई-शासन, ई-प्रशासनाच्या माध्यमातून शासकीय व प्रशासकीय प्रक्रिया शिस्तबद्ध व सुरक्षित करून नागरिकांना कार्यक्षमपणे तत्पर सेवा पुरवण्यात येत आहेत. मात्र वाढती लोकसंख्या व भौगोलिक विविधता, संसाधनाची कमतरता पाहता शासन व प्रशासनाच्या कारभारामध्ये अधिक पारदर्शकता, गतिमानता व जबाबदारी, उत्तरदायित्त्व निर्माण करणे हे वर्तमान सु-शासानासामोरील मोठे आव्हान आहे.

**संदर्भ :**


1. C.L. Beoghel Yogendra Kumar, Good Governance Concept and apprpaches, Kanishka Publishars New Dhelhi.2006.
2. Janin R.B. Globlization & Good Governance, Deep & Deep Publication Pvt.Ltd. New Delhi-2005.
3. पोहेकर प्रीती (डॉ.), लोकप्रशासनाची मूलतत्त्वे, अरुणा प्रकाशन, लातूर-2008,
4. यशमंथन यशदा, पुणे, जानेवारी-मार्च २०१०
5. योजना मासिक (हिंदी), ऑगस्ट २०१८, पृ.६८ व ७२.
6. योजना मासिक (मराठी), जानेवारी २०१८, पृ.५६, ६३,६४,७०,७१, ७२.
7. यशमंथन यशदा, पुणे, एप्रिल-जून २०१७ पृ.३ ते ६
8. योजना मासिक (मराठी), फेब्रुवारी २०१८, पृ.५ ते ३६.
9. योजना मासिक (मराठी), सप्टेंबर २०२३ २०१८, पृ.४,५, ४१,४३.